PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

# बंजारा मूळस्थान

**कल्पना प्रतापराव राठोड**
पी.एच्.डी. इतिहास (विद्यार्थी)
रा. प्लॉट नं. 3, जयभवानी नगर,
शिवाजी चौक जवळ,
सिडको, औरंगाबाद – 431003
महाराष्ट्र भारत

**डॉ गोपाळसिंग बच्छिरे**
(इतिहास विभाग प्रमुख)
सिध्दार्थ महाविद्यालय, जाफ्राबाद,
जि.जालना
महाराष्ट्र भारत

## प्रस्तावना :

मानवाला आपली पाळेमूळे शोधण्याची जिज्ञासा असते. आपले मुळस्थान कोणते? आपण कोठून आलो? हे प्रश्न त्याला पडतात. बंजारा समाज हा भटकंती स्वरुपाचा व्यवसाय करीत असल्यामुळे त्यांच्या मुळस्थानाचा शोध घेताना अनेक बाबी विचारात घ्याव्या लागतील, एखाद्या समाजाचे मुळस्थान निश्चित करताना, त्यांची संस्कृती, भाषा, आहार पध्दती, धर्म संकल्पना इ. गोष्टी महत्वपूर्ण आहेत. बंजारा समाज हा एक भाषा, एक वेशभुषा व समान सांस्कृतीक प्रणाली जोपासित आला आहे. बंजारा समाजाची ही वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती निश्चितपणे विशिष्ट भूभागात निर्माण झाली असावी. एखाद्या समाजाची संस्कृती निर्माण होण्यास काही शतकांचा काल निश्चित लागतो. पशूपालनाकडून, लदेणी, (मालाची ने–आण बैलाच्या पाठीवरुन करणे.) या व्यावसायाकडे वळवल्यावर देश–विदेशात त्यांचा संचार होवु लागला.

बंजारा समाज मुळस्थाविषयी समाजशास्त्रांनी विविध मते मांडली आहेत. कोणी त्यांना शक, हुणांचे वंशज मानतात, तर कोणी मध्य आशियातील भटक्या जातीत त्यांचा समावेश


SECOND INTERNATIONAL CONFERENCE ( ICDBVIHCIM 2018 ) 6-7 OCTOBER 2018
SPECIAL ISSUE –OCT 2018 www.puneresearch.com/times (MS) INDIA
(IMPACT FACTOR 3.18) INDEXED, PEER-REVIEWED / REFEREED INTERNATIONAL JOURNAL

करतात. द्रविडांशी त्यांचे नाते जोडले जाते. आर्यजनापैकी एक असे म्हटले जाते. बंजारा समाजाने आपले प्राचीनत्व, आपली गणसंस्कृती जोपासण्याचा प्रयत्न केला. प्राचीन सिंधू संस्कृतीशी त्यांचे लागे बांधे आहेत. हे ही सिध्द केले जात आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :–**

1. बंजारा समाजाची सांस्कृतीक पार्श्वभूमी आहार पध्दती, भाषा इ. चा विचार करुन बंजारा मूळस्थानाचा शोध घेणे.
2. बंजारा समाजाचा भटकंती व्यवसाय असल्यामुळे त्यांचा विविध प्रांताशी असलेला संबंध पडताळून पाहावे.
3. बंजारा प्राचीन संस्कृती आहे. सिंधू संस्कृतीशी त्यांचे नाते जोडले जाते, त्यांचा संबंध पडताळणे.

**बंजारा मूळस्थान व संस्कृती :–**

टॉयन्बीच्या मते, ‘इतिहास म्हणजे मानवी संस्कृतीचा उदय आणि अस्त होय.’ कोणत्याही संस्कृतीच्या उदय व अस्त होताना, त्या संस्कृतीतील काही पद्‌चिन्हे पुढील संस्कृतीत संक्रमित होत असतात. उदा. भारतीय समाजातील धार्मिक विश्वास व सिंधू संस्कृती यांचा संबंध आहे.

सिंधू संस्कृती प्रामुख्याने बलुचिस्तान, उत्तर पश्चिमी सीमा प्रदेश, गुजरात, जम्मू (मॉदा), उत्तर अफगाणिस्थान इ. प्रदेशात पसरलेली होती. वरील प्रदेशांशी बंजारा समाजाचा संबंध प्राचीन काळापासून आहे. बंजारा समाजात कडूनिंब, वृषभ, कांस्य यांना धार्मिक महत्त्व आहे. जादूटोणा, गंडादोरा, भूतप्रेत यावर अत्याधिक विश्वास आहे. बंजारा समाज साती भवानी पूजक (सप्त मातृका पूजक) समाज आहे. वरील धार्मिक विश्वास सिंधू संस्कृतीत आढळतात. बंजारा स्त्रिया स्वतः ची वस्त्रे प्रावरणे स्वतःच शिवतात, त्यावर कलाकुसर करतात. ही प्राचीन परंपरा त्यांच्या संस्कृतीचा भाग आहे. ‘गोणपाटाच्या विणकामाचे टाके व स्त्रियांच्या वस्त्रालंकावरील खुणा ही चित्रलिपीच होय, असे रामसिंग भानावत म्हणतात.’[1]

बंजारा स्त्रियांची आभूषणे ही चांदी धातू पासून अधिकत्तर बनवतात. प्राचीनकाळापासून चांदी ही अफगाणिस्थान व राजपूताना ह्या भागात सापडे प्रा. मोतीराज राठोड यांनी, ‘सिंधू संस्कृती–पूर्व गोर बंजारा संस्कृती?’ या पुस्तिकेत बंजारा समाजात प्रचलित ही आभूषणे, मणीमाला, दैनंदिन वापरातील वस्तु इ. सिंधू वस्तुंशी मेळ दाखवितात. हे दाखवून दिले आहे.

आर्य–पूर्व समाज हा मातृसत्ताक होता. बंजारा संशोधक आ.क. राठोड यांच्या मते, बंजारा समाजाचा सांस्कृतीक इतिहास अभ्यासतांना, बंजारा समाजात मातृसत्ताक कुटुंब पध्दतीचे अवशेष अजूनही आहेत. असे आग्रही प्रतिपादन केले आहेत. सिंधू संस्कृती ही व्यापारी संस्कृती होती. व्यापारी व्यवस्थेतील, वितरण व्यवस्था सुदृढ असली पाहिजे. बंजारा समाज हा वितरण व्यवस्थेचा, एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

बंजारा समाज अभ्यासक भिमणीपूत्र मोहन नाईक त्यांच्या मते, सिंधू सभ्यता के तीन हजार वर्ष पहले बलूचिस्तान प्रांत के मेरीगढ जिल्हा सीबी का उल्लेख गोर लोकगीतों में आता है।

मेरीगढ रो सन विरेणा सनेभायीर हरपणी, जु उकड चाली, जु तारी भेन उकडचाली विरेना तोन कु आव घेरी नींद पातळे सेलाम[2] नायक सरके ताजा संशोधन के भुताबिक, वही वो गोरप्रांत है।

हरियाणा येथील राखीगढी येथे डेक्कन कॉलेजचे कुलगुरु डॉ. वसंत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उत्खनन झाले. त्याचे निष्कर्ष सांगतात, (आर 1 ए, 1) ही जनुके, ज्याला स्थुलमानाने आर्यन जनुके म्हटली जातात, त्यांचा सिंधू संस्कृतीत पूर्णतः अभाव आहे. याचाच दुसरा अर्थ असा की, सिंधू संस्कृतीत मिळालेल्या जनुकांचे अधिक जवळचे साधर्म्य आहे ते द्रविडांचे! वरील संशोधन भारतीय इतिहासलेखनाला कलाटणी देणारे ठरेल.[3] जसजसे अधिकाधिक होत जाईल. तसतसे सत्य प्रकाशात येईल.

**बंजारा मुळस्थान : अफगाणिस्थान, उत्तर पश्चिमी प्रदेश**

बंजारा समाज आजही अफगाणिस्थानात, पाकिस्थानात वास्तव्यास आहे. आजही त्यांच्यात सांस्कृतीक एकात्मता आहे. अफगाणिस्थान हा प्राचीन काळापासून हिंदूस्थानाचा भाग होता, ऋग्वैदिक व अवेस्ताच्या पुराव्यानुसार वैदिक सरस्वती नदी दक्षिण अफगाणिस्थानातील प्राचीन हरहैवती आहे. जिच्या काठी वेद रचले आहेत.[4]

दसवी सदी के अंत तक अफगाणिस्तान पर प्राय हिंदू राजाओं का शासन रहा। रोमिला थापर ने भी लिखा है, सांस्कृतिक दृष्टिसे अफगाणिस्थान और भारत में समानता रही, जिसके पुष्टि बामियान स्थल से प्राप्त साक्ष्य से होती है।[5]

गजनीवरुन हिरातकडे जाणाऱ्या मार्गावर गोर प्रदेश आहे. गोर पहाडी व गोरबंद नदी आहे. भूक्या व वडत्या (बंजारा समाजातील दोन गोत्र) त्यांचा विवाह गोर नदीकाठी झाला. म्हणून त्यांची संतान 'गोर' म्हणून ओळखली जावू लागली.[6] बंजारा समाज हा स्वतः ची ओळख 'गोर' म्हणून करुन देतो. त्यातुन प्रांताचा बोध ही असू शकतो. उदा. मारवाडा प्रांतातून आलेले 'मारवाडी', महम्मद गोरी हा 'गोर' प्रांतातील म्हणूनच 'गोरी', 'घोरी' म्हणून ओळखला जावु लागला.

प्राचीन काळापासून पश्चिमी देशांशी भारताचा व्यापार हा अफगाणिस्तान मार्ग होई. बंजारा परंपरागत वदाई मंत्र, ओळंग इ. तू 'धोळो घोडो' (सफेद घोडा) असा उल्लेख येतो. बंजारा समाजातील देवता ह्या सफेद घोड्यावर आरुढ झालेला दाखवतात. हे सफेद घोडे प्रामुख्याने बाल्ख म्हणजे प्राचीन वाल्हिक देशातून आणित, विशेष म्हणजे तपस्सू व भल्लिक हे दोन बंजारा व्यापारी बंधू बाल्ख प्रांतातून व्यापारासाठी निघाले होते. याचा अर्थ, बाल्ख प्रांताशी बंजारा समाजाचा प्राचीन संबंध आहे. 'ह्युएन–त्संग' याने सांगितले त्या, दंतकथेनुसार बुध्दाचे शिष्याव पतकरलेल्या तपस्सू व भल्लिक नामक व्यापाऱ्यांनी या देशात सर्वप्रथमत बौध्द धर्म आणला.[7]

भारत व युरेशिया यांना जोडणारा हा व्यापारी दृष्ट्या महत्त्वपूर्ण प्रांत आहे.

**बंजारा मूलस्थान : राजपुताना / महत्तर पंजाब**

राजपूतांना प्रांतातील संस्कृती, भाषा, खाद्यान्न, सण, उत्सव इ. चा प्रभाव बंजारा समाजावर आहे. दक्षिण भारतातील बंजारा समाज हा आपले मुळस्थान राजस्थान असल्याचे सांगतात. राजस्थानातून विशेषतः किसनगढ येथून बंजारा समाजाचे भाट येतात, त्यांच्या नोंदीनुसारही बंजारा समाज राजस्थानातून आला आहे.

बरार जनगणना रिपोर्ट 1881 नुसार, राठोड पहले जोधपूर में रहते थे। चौहानों का निवासस्थान उत्तरप्रदेश के मैनपुरी जिले में था। पवाँर धरनागढ और वडतिया चित्तोड से आये। तोमर या तुरिया लोग दिल्ली के आस–पास रहते थे।[8] अशी नोंद आहे. मुंबई व कलकत्ता बंदराचा विकास होण्यापूर्वी सौराष्ट्रातील (गुजरात) बंदरे व्यापारासाठी महत्त्वपूर्ण होती. राजस्थानातून गुजरातकडे हे मार्ग जात. त्यामुळे बंजारा समाज हा लेदणीच्या व्यवसायामुळे राजपूतान्यात वास्तव्यास होता.

समाजशास्त्री वान फ्युरर हे मिनड्राफ, ने बंजारो के मूल निवासस्थान के बारे में लिखा है– दुसरे आदिवासियों की तरह, बंजारोंने विशेष भूक्षेत्र में अपने को सिमित नही रखा, यद्यापि उनकी शारीरिक बनावट, भाषा तथा वेश यह संकेत देती है उत्तर पश्चिमी भारत विशेषता राजस्थान इनका मूलनिवास है।[9]

बंजारा बोलीभाषेवर पंजाबी व उत्तर भारतीय बोली भाषेचा प्रभाव आहे. श्री. वीर राजेंद्र ऋषिंनी भटक्यांच्या मूलस्थानाची कल्पना महतर पंजाबने केली आहे. जिसमें पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, दिल्ली और चंदीगढ तथा राजस्थान के सीमावर्ती क्षेत्र सामील है।[10]

माळवा प्रांतातील नेमाडी भाषेशी, बंजारा बोलीभाषा साधर्म्य दर्शविते. तांडा पंचायतीतील कसळतमध्ये कुशल विचाराणे 'राजा भोज' भोपाळगड इ. चा उल्लेख येतो. आहार पध्दती, गहू व्यापार, बैलांचा व्यापार इ. कारणांनी माळवा प्रांताशी बंजारा समाजाचा पूर्वापार संबंध जोडला गेला आहे.

**बंजारा मुळस्थान : उत्तर प्रदेश**

प्राचीन काळापासून पशुपालकांसाठी मथुरा हे नंदनवन होते. प्राचीन काळापासून अनेक पशुपालक जमाती मथुरेच्या आसपास रहात होत्या. मथुरानगरी प्राचीन काळापासून महत्त्वपूर्ण व्यापारी शहर होते. त्यामध्ये देश के सार्थवाह और व्यापारी पूर्व से पश्चिम की और यात्रा करते समय, मथुरा के भांडागारिओंको से संपर्क करते हुए आते–जाते थे।[11] लदेणीच्या व्यवसाया निमित्तही बंजारा समाज मथुरा नगरीशी जोडला गेला होता.

बंजारा साती भवानी पूजक आहे. त्यापैकी 'कंकाळी' देवी बंजारा समाजातील अनेक कुलगोत्रात पूजिली जाते कंकाळी हे कालीचे रुप मानतात. त्यामुळे चित्तोडची 'महाकाली' कलकाऱ्याची महाकाली ही देवी समजली जाते. प्रत्यक्षात, कंकाळी मातेचे स्थान मथुरेत आहे. आजघडीला बंजारा समाजाला याचा विसर पडला आहे. इस समय यहॉ पर देवी का एक छोटासा मंदीर है। जिसमें कंकाळी के नामसे देवी की लघु प्रतिमा प्रतिष्ठित है, उसी के नाम पर इस स्थान को 'कंकाली टिला' कहॉ जाता है।[12] छोटेसे राऊळ हे बंजारा समाजाचे वैशिष्ट्य आहे.

मथुरा होळी उत्सवासाठी प्रसिध्द आहे. या उत्सवात महिला मोठ्या, मोठ्या काठ्या घेवून पुरुषांवर प्रहार करतात व पुरुषगण आपल्याकडील ढालीने त्या प्रहारापासून बचाव

करतात. कुछ बंजारे समुहों में आज भी ब्रज जैसी होली मनाई जाती है। महाराष्ट्र में बसे बंजारों की महिलाएँ पुरुषों के साथ लट्ठमार होली खेलती है।[13]

बंजारा दिपावली उत्सवात गोधनांची पूजा करतात दिवाळीच्या दिवशी अंगणात गायींच्या शेणापासून गोवर्धन (गोदन) बनवून त्याला पंजीरीचा (गोड पदार्थ) नैवद्य दाखवून, घरोघरी गोठ्यात, अंगणातील गोवर्धनासाठी पूजा होते. उत्तर भारतात ब्रिटिश शासनापूर्वी, कित्येक जिल्ह्यात बंजारा समाजाचा प्रभाव होता. तिथल्या अनेक कुरणांवर त्यांचा अधिकार होता. तिथल्या पहाडी प्रदेशात त्यांना विशेष मान होता. आज का पहाडगंज, मुल्तानी तांडा के नाम से संबोधित होता था। इस तांडे के नायक डल्ली चौकेर नायक कहलाते थे। [14] उत्तर भारतीय बंजारा हा स्वतः ला तिथलाच मुळनिवासी म्हणवितो.

प्राचीनकाळी व्यवसायानिमित्त, भटकंती करणाऱ्या बंजारा समाजाचा अनेक प्रांताशी संबंध आला, त्यामुळे त्यांच्या भाषेचे स्वरुप संमिश्र आहे. परंतु त्यातही त्यांच्या मुळ प्राचीन भाषेचे शब्द येतात जे इतर भाषेत सापडत नाही. उदा. याडी (आई), गोणी (पत्नी), बाटी (भाकरी), पेना (प्राचीन), खड (गवत) इ.

## निष्कर्ष :

1. सिंधु संस्कृतिशी निगडीत प्रदेश बंजारा मुळस्थाकडे निर्देश करतात.
2. अफगाणिस्तानातील गोर प्रांत व बाल्ख प्रांत यांच्याशी बंजारा समाजाचा घनिष्ठ संबंध दिसून येतो.
3. बंजारा समाजातील सण, उत्सव, आहार पध्दती, भाषा इ. राजपूताना, उत्तर भारतीय प्रदेश यांच्याशी साधर्म्य दर्शवितात.
4. पशुपालन व लदेणी व्यावसायानिमित्त उत्तर, पश्चिमी प्रदेशात बंजारा समाजाचा वावर अधिक होता.
5. भारताचा उत्तर, पश्चिमी प्रदेश त्यांच्या मुळस्थानाशी संबंधित आहे.

## संदर्भ :

1. राठोड आत्माराम कनिराम, गोरवट साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती 2006, पृ. 121
2. नाईक मोहन, मारोणी, निर्मल प्रकाशन नांदेड, पृ. 46
3. सोनवणी संजय, राखीगढीचा रहस्य भेद, दिव्य मराठी, रसिक पुरवणी, दि. 23 स. 2018 पृ. 3
4. तत्रैव, पृ. 3
5. तातडे सोहन, सिंह विद्यासागर, भारत के सीमावर्ती देशों का इतिहास, पारीक बुक्स, जयपूर पृ. 23
6. पाटील बळीराम हिरामण, यवतमाळ प्रकाशक, स्मारक समिती यवतमाळ, पृ. 47, शाम ब्रदर्स, नागपूर, 1973
7. देवपुजारी, मु.बा. कुलकर्णी, प्राचीन भारत आणि शेजारील राष्ट्रे, विद्या बुक्स, औरंगाबाद पृ. 41
8. शर्मा श्रीराम बंजारा समाज, दक्षिण प्रकाशन, हैद्राबाद, पृ. 49
9. तत्रैव पृ. 87
10. तत्रैव पृ. 86
11. मित्तल प्रभुदयाल, ब्रज का सांस्कुतिक इतिहास, राजकमल प्रकाशन, दिल्ली, पृ. 65
12. तत्रैव पृ. 154
13. शर्मा श्रीराम, बंजारा समाज, दक्षिण प्रकाशन, हैद्राबाद, पृ. 23
14. तत्रैव पृ. 101